# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26



**पाटण : प्रशांतचंद्र महालनोबिस यांच्या प्रतिमेचे पूजन करताना एस.डी.पवार, डॉ. सौ.एच.व्ही.काटे व डॉ.एस.आर.सुपनेकर.**

# प्रशांतचंद्र महालनोबिस यांचे कार्य जगाला मार्गदर्शक : डॉ. एच. व्ही. काटे

**पाटण :** आर्थिक विकास व सांख्यिकीय क्षेत्रात आंतरराष्ट्रीय दर्जाचे भारतीय संख्याशास्त्रज्ञ प्रशांतचंद्र महालनोबिस यांचे कार्य जगाला मार्गदर्शक असल्याचे प्रतिपादन येथील बाळासाहेब देसाई कॉलेजच्या आयक्युएसी समन्वयक प्रा.डॉ. सौ.एच.व्ही.काटे यांनी केले. येथील कोयना एज्युकेशन सोसायटीच्या बाळासाहेब देसाई कॉलेजच्या संख्याशास्त्र विभागाच्यावतीने राष्ट्रीय संख्याशास्त्र दिन तसेच प्रशांतचंद्र महालनोबिस यांची जयंती कार्यक्रमप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी डॉ.एस.डी.पवार, प्रा.डॉ. एस. आर. सुपनेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य डॉ.एस.डी.पवार म्हणाले, मानवी जीवनात विविध स्वरूपाची माहिती जमवणे, तिचे विश्लेषण करणे,स्पष्टीकरण देणे आणि आलेले अनुमान सारांश रूपाने प्रस्तुत करणे हे काम संख्याशास्त्र करत असते. संख्याशास्त्रामुळेच आज सर्व ज्ञान शाखा समृद्ध झाल्या आहेत.प्रा.डॉ.संजय सुपनेकर यांनी प्रास्ताविक केले.प्रा.डी.डी. थोरात यांनी आभार मानले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवकवर्ग व विद्यार्थी,विद्यार्थिनी उपस्थित होते.